अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । बुधवार, दि. १९ जून २०२४ । वर्ष : २२ वे अंक : २६० वा किंमत : ५ रुपये पाने १२

## दोघांचा विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर** : मोहोळ आणि अक्कलकोट तालुका परिसरात दोघांनी विविध कारणावरून विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. या घटना मंगळवारी (दि.१८) सकाळच्या सुमारात घडल्याची नोंद तालुका पोलीसात झाली आहे. पहिली घटना गोटेवाडी (ता. मोहोळ) येथे सकाळी ७ वाजेच्या सुमारास घडली. कुमार खांडेकर (वय ५३) असे विष प्राशन केलेल्या इसमाचे नाव आहे. त्याची पत्नी घरातून निघून गेल्याने त्याने विषारी द्रव प्राशन केले. त्याला शंकर (मुलगा) यांनी मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून बेशुद्ध अवस्थेत सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. दुसरी घटना मुगळी (ता. अक्कलकोट) येथे घडली. सुरेखा कुंभार (वय ४५) असे त्या महिलेचे नाव आहे. तिला अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून विजय (पुतण्या) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे.

## मंदिरातील त्रिशूल घेऊन मारहाण

**बार्शी** : गतिमंद मुलाला शिवीगाळ का करतो? अशी विचारणा केल्याच्या कारणावरून मंदिरातील त्रिशूल घेऊन मारहाण केल्याने एक जण गंभीर जखमी झाला. ही घटना चोरमुले प्लॉट (बार्शी) येथील महादेव मंदिरासमोर रविवारी घडली. बार्शीच्या पोलिसांनी एका विरुद्ध गुन्हा दाखल केला असून तो घटनेनंतर फरार झाला आहे. अंबादास सुरेश कुचे (वय वर्षे ४०, रा. धस, पिंपळगाव रोड, बार्शी) असे जखमीचे नाव आहे. बार्शी पोलिसांनी मलिंगा महादेव सदाफुले (रा. चोरमुले प्लॉट) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अंबादास कुचे हे त्यांच्या मित्र विशाल कांबळे यांच्या तेरा वर्षीय गतिमंद मुलास घेऊन महादेव मंदिराजवळ थांबले होते. त्यावेळी मलिंगा मुलास शिवीगाळ करीत होता. त्याला शिवीगाळ का करतो? असे म्हणाले असता मलिंगा हा मंदिरात जाऊन त्रिशूल घेऊन मारहाण केली. हवालदार माने हे पुढील तपास करीत आहेत.

# चिकमहूदजवळ मृत्यूचे थैमान

## ● ट्रकखाली चिरडून सहा महिला मजूर ठार
## ● कटफळ गावावर शोककळा; चालकास चोप

सुराज्य/सांगोला

**पंढरपूर-कराड रोडवरील सांगोला तालुक्यातील चिकमहुद जवळील बंडगर वाडी पाटी जवळ रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या मजूर महिलांना एका मालट्रकने चिरडून टाकले. या भीषण अपघातात सहा मजूर महिला जागीच ठार झाल्या असून एक महिला गंभीर जखमी झाली आहे. मंगळवारी दुपारी साडे चार वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली. मृत आणि जखमी महिला सांगोला तालुक्यातील कटफळ येथील राहाणाऱ्या आहेत.**

- **गावाकडे जाण्यासाठी या महिला चिकमहूदजवळ रस्त्याच्या कडेला थांबल्या होत्या. भरधाव वेगातील ट्रकने त्यांना उडविले**
- **ग्रामस्थांनी ट्रक चालकास पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले.**
- **बंडगरवाडी पाटी या थांब्याजवळ अपघाताचा थरार**



कटफळ येथील महिला चिकमहुद येथे ऊस लागवडीसाठी शेतात कामासाठी गेल्या होत्या. कामावरून परत गावाकडे जाण्यासाठी बंडगरवाडी पाटीजवळ वाहनाची वाट पाहत थांबल्या होत्या. आटपाडी मार्गावरील चिकमहुद ते कटफळ हे सहा किलोमीटर अंतर आहे. पंढरपूरहून कराडला जाणारा वीस चाकी माल ट्रक (एम एच-५० -एन-४७ ५७) हा वळणावर वळत असताना चालकाचा वाहनावरील ताबा सुटला आणि भरधाव वेगाने चाललेला हा ट्रक रस्त्याच्या कडेला उभ्या असणाऱ्या महिलांच्या अंगावरून गेला.त्यात पाच महिला जागीच ठार झाल्या तर एक महिला रूग्णालयात उपचार घेत असताना मरण पावली.एकूण सात महिला तिथे उभ्या होत्या. अन्य एका जखमी महिलेवर उपचार सुरू आहेत.

भरधाव वेगाने जाणाऱ्या ट्रकमध्ये कोळसा भरलेला होता. वीस चाकी ट्रकने रोडच्या कडेला एसटीची वाट पाहत थांबलेल्या मजूर महिलांना उडवले. एका जखमी महिलेला पंढरपूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ठार झालेल्या हिलांची नावे या प्रमाणे इंदुबाई बाबा इरकर (वय ५०), भिमाबाई लक्ष्मण जाधव (वय ४५), कमल यल्लाप्पा बंडगर (वय ४०), सुलोचना रामा भोसले (वय ४५), अश्विनी शंकर सोनार (वय २३) जागीच मंगल आदिनाथ पंडित (वय २५). मीनाबाई दत्तात्रय बंडगर (वय ५०) या दोघी गंभीर जखमी झाल्या आहेत. मंगल ही जखमी महिला उपचार सुरू असताना मरण पावली. सात महिला मिळून म ोलमजुरीचे काम करण्यासाठी चिकम हूद येथील शेतकऱ्यांच्या शेतावर गेल्या होत्या. या घटनेमुळे कटफळ गावावर शोककळा पसरली आहे. दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक भीमराव खणदाळे, पोलीस फौजफाट्यासह घटनास्थळी दाखल झाले. ग्रामस्थांनी ट्रक चालकास पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले.

### आमदार शहाजीबापूंकडून प्रत्येकी ५० हजारांची मदत



आमदार शहाजीबापू पाटील यांनी या घटनेविषयी दुःख व्यक्त केले असून मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत तसेच जखमी महिलेच्या उपचारासाठी २५ हजार रुपयांची व्यक्तिगत मदत जाहीर केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संपर्क साधून मृतांच्या नातेवाईकांना अधिकची मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे आमदार शहाजीबापू पाटील यांनी सांगितले. सदर अपघात घडल्यानंतर तहसीलदार संतोष कणसे, पोलीस निरीक्षक भीमराव खंणदाळे शेकापचे ज्येष्ठ नेते डॉ. बाबासाहेब देशमुख, शिवसेना शिंदे गटाचे नेते दिग्विजय शहाजी -पाटील सुरेश कदम आदींनी घटनास्थळी भेट देऊन दुःखद घटनेबद्दल दुःख व्यक्त केले व त्यांच्या नातेवाईकांचे सांत्वन केले नागरिकांना शांतता ठेवण्याचे आवाहन केले.

### दुभाजक नसल्याने अपघाताला आमंत्रण

पंढरपूर-आटपाडी विटा कराड चिपळूण या राज्य मार्गावर टोळ नाका नसल्याने अवजड वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. दुभाजक नसल्याने वाहनांना कट मारण्याच्या नादात सातत्याने अपघाताला आमंत्रण देण्यात येत असल्याचा प्रकार या ठिकाणी आहे. याठिकाणी त्वरीत गतिरोधक बसवण्याची मागणी करण्यात येत आहे.





या मार्गावर गेली एका वर्षामध्ये अपघात होऊन २५ हून अधिक नागरिक मरण पावले असून सदर रस्ता चार पदरी करण्यासाठी आमदार शहाजी पाटील यांनी लक्ष द्यावे तसेच रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात काटेरी झुडपे वाढलेली आहेत. त्यात चिकमहुद ते दिघंचीपर्यंत रस्ते वळणावळणाचे असल्याने अपघाताचे प्रमाण जास्त आहे.

**- शोभा सुरेश कदम,** सरपंच, चिकमहूद



## डाटा एन्ट्री ऑपरेटरला लाच घेताना पकडले

सुराज्य/बार्शी

बाशी पुरवठा खात्यामधील डाटा एन्टी ऑपरेटर वर्षा काळे यांना लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने १५० रूपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले. ही घटना दि. १८ जून रोजी दुपारी३.०० वाजता घडली. याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक खाते सोलापूर विभागाचे उपअधिक्षक गणेश कुंभार यांनी ही कारवाई केली. या प्रकरणात बार्शी तहसिल कारव्यालय अंतर्गत प्रवठा खात्यामध्ये श्रीमती.वर्षा भगवान काळे या डाटा एन्ट्री ऑपरेटर म्हणून कार्यरत होत्या. या प्रकरणातील तक्रारदारानेआपल्या दारिद्रय रेषेखालील शिधापत्रिकावर धान्य मिळत नसल्यांची तक्रार केली होती व या संदर्भातशिधापत्रिका नोंदणीकृत करून देण्यासाठी अर्ज केला होता.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आता मी शाळेत चालली आहे, बाकीचे पाणी तू भर !

कल्याण
480-25-140
मुंबई
146-13-247

# बालकाच्या मृतदेहानंतर चौघे गायब होण्यानं हादरलं सोलापूर

**● एकापाठोपाठच्या भयानक घटनांनी चक्रावलं पोलीस दल**

- **कुंटुंबातील सदस्यांच्या डोळ्याला डोळा लागेना; तहानभूकही हरपली**
- **डोक्यात माजलं नको त्या विचारांचं काहूर**
- **थोरला भाऊ वेडापिसा होऊन शोधतोय छोट्या भावासह वहिनी अन् लहानग्या पुतण्यांना**
- **रस्त्याकडं डोळं लावून बसलेल्या वयोवृध्द मातेवर भोवळ येण्याची वेळ**

सुराज्य/सोलापूर

**गुन्हेगारी विश्वात राज्यात तुलनेत तसं पुढं असलेल्या सोलापुरात घडत असलेल्या लागोपाठ उघडकीस येत असलेल्या घटनांमुळं इथलं समाजमन तसं चिंतातुर झालं आहे. दहा महिन्याच्या बालकाचा मृतदेहच स्मशानभूमीतून गायब होण्याच्या भयावह अन् तितक्याच गंभीर घटनेला अद्याप ४८ तास होताना न होतात तोपर्यंत एकाच कुंटुंबातील चौघे गायब होण्याची घटना उघडकीस आली. बालकाच्या मृतदेहानंतर चौघे गायब होण्यानं अक्षरश: सोलापूर हादरलं. एकापाठोपाठच्या घटनांनी पोलीस दलदेखील चक्रावलं आहे.**

दरम्यान घरातील मोठा भाऊ त्याची पत्नी आणि दोन लहान मुले बेपत्ता झाल्यानं क्षीरसागर कुंटुंबातील सदस्यांच्या डोळ्याला डोळा लागेना अशी परिस्थिती झाली आहे. त्यांची तहानभूकही हरपली आहे. डोक्यात माजलं नको त्या वाईट साइट विचारांचं काहूर माजत आहे. कुंटुंबातील थोरला भाऊ वेडापिसा होऊन छोट्या भावासह वहिनी अन् लहानग्या पुतण्यांना रेल्वे स्थानक, एसटी स्टँन्डसह सोलापूर अन् अक्कलकोटमधील गल्ली ना बोळ धुंडाळत आहे. मुलगा, सून आणि नातवंड कधी एकादशी येतील म्हणून रस्त्याकडं डोळं लावून बसलेल्या वयोवृद्ध मातेवर अक्षरश:: भोवळ येण्याची वेळ आली आहे.

याबाबत घटनास्थळावरून मिळालेली माहिती अशी की, रघुनाथ भीमाशंकर क्षीरसागर, अंकिता रघुनाथ क्षीरसागर, मुलगा भीमाशंकर व मुलगी खुशी यांच्या समवेत मुळेगांव तांडा याठिकाणी भाचीच्या लग्नासाठी आपल्या कुटुंबासमवेत गेले होते. लग्न उरकून आल्यानंतर त्यांनी डीमार्ट याठिकाणी आपल्या कुटुंबासमवेत खरेदी केली. त्यानंतर गणेशनगर, मुळेगांव रोड येथील राहणारे त्याचे साडू ज्ञानेश्वर राऊत यांच्या घरी शुक्रवारी (ता.१४) रात्री मुक्काम केला. शनिवारी सकाळी उठून चहा नाश्ता करून, आपल्या कुटुंबासमवेत अक्कलकोटला जायचे आहे. कटिंगचे दुकान उघडायचे आहे असे सांगून ज्ञानेश्वर राऊत यांना सांगून ते घरातून आपली पत्नी अंकिता, मुलगी खुशी, मुलगा भीमाशंकर यांना घेऊ निघून गेले.

संध्याकाळ झाल्यानंतर भाऊ निरंजन व आई पार्वती यांनी मिळून त्यांना फोन पण त्याचा फोन लागलाच नाही. त्यांनी रघुनाथचा साडू ज्ञानेश्वर राऊत यांच्याकडे चौकशी केली. यावेळी सांगितले की, अक्कलकोटला जातो म्हणून ते



आमच्या घरातून निघून गेले आहेत. निरंजन क्षीरसागर यांनी आपला भाऊ रघुनाथ याची सासुरवाडी असणाऱ्या हुसनुर कारखाना आळंद याठिकाणी चौकशी केली असता ते त्याठिकाणी ते नसल्याचे सांगण्यात आले. सगळीकडे चौकशी केली तरी ते मिळून न आल्याने सोलापूर येथील एमआयडीसी पोलीस ठाण्यात निरंजन क्षीरसागर यांनी भावासह चौघे बेपत्ता झाल्याची मिसिंगची तक्रार दिली.

दाखल तक्रारीनुसार रघुनाथ भीमाशंकर क्षीरसागर, अंकिता रघुनाथ क्षीरसागर, मुलगा भीमाशंकर व मुलगी खुशी (सर्व राहणार गणेश नगर, मुळेगाव रोड सोलापूर) अशी बेपत्ता झालेल्यांची नावे आहेत. हे सर्व १५ जून रोजी सकाळी साडेसात वाजता निघून गेले ते आलेच नाहीत. या घटनेचा तपास पोलीस कर्मचारी एस. एन. गायकवाड करीत आहेत.



रघूनाथ क्षीरसागर हा आपल्या पत्नी व दोन मुलांसमवेत घरातून निघून गेला आहे. बेपत्ता रघुनाथला कुणाचा त्रास होता काय? तो आपल आख्खं कुंटुंब घेवून जाण्यामागचे नेमके काय कारण आहे? याचा शोध आम्ही घेत आहोत. त्याचा शोध लवकरच लावू. रेल्वे व बसस्थानक या ठिकाणी प्रत्यक्ष पोलिस कर्मचारी यांना पाठवून सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**- प्रमोद वाघमारे,** वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एमआयडीसी पोलीस ठाणे, सोलापूर



माझा भाऊ रघुनाथ याला कोणतेही सावकाराचे कर्ज नाही. एका बॅकचे कर्ज आहे. तेपण मीच भरत आहे. त्याला कोणताही त्रास नव्हता, तो व्यवस्थितरित्या दुकान संभाळत आपल्या कुंटुंबाकडे चांगल्याप्रकारे लक्ष देत होता. त्याचे कोणाशीही वैर नव्हते. पोलिसांनी लवकरात लवकर माझ्या भाऊ,वहिनी,पुतणी,पुतण्या याचा शोध लावावा. पोलिसांकडून मला न्याय मिळेल अशी अपेक्षा आहे.

**- निरजंन क्षीरसागर,** थोरला भाऊ, सोलापूर

### पोलिसांनादेखील लागेना अंदाज

वास्तविक पाहता सलून व्यावसायाशी संबंध असलेल्या निरंजनचे कोणाशी वैर नव्हते. त्याच्या कुंटुंबातदेखील वाद नव्हता. त्याच्याकडे कोण्या सावकराचे कर्ज नव्हते. तो निघून जावा, असे कोणतेच कारण प्रथमदर्शनी दिसत नाही. तरीपण शनिवारपासून रघूनाथ हा बायको मुलांसह गायब आहे. त्याच्या बेपत्ता होण्याचा अंदाज पोलिसांनादेखील लागेला झाला आहे. शोध कार्यादरम्यान पोलीस सर्व शक्यता पडताळून पाहात आहेत.

### बेपत्ता रघूनाथचा भावासह सलूनचा व्यावसाय

रघूनाथ व निरजंन या दोघां भावांचे मिळून अक्कलकोट येथील कारंजे चौकात शंकर पार्वती नावाचे मोठे कटिंग सलूनचे दुकान आहे. त्यांच्या व्यवसाय ही चांगला आहे. व त्यांची आर्थिक परिस्थिती देखील अगदी चांगली आहे.

### चौघांच्या बेपत्ता होण्याच्या प्रकरणाचे काही हायलाईटस् ...

- **सोलापुरातील एकाच घरातील चार जण बेपत्ता; पती पत्नी, मुलांचा समावेश**
- **गायब रघुनाथ क्षीरसागरांचा सकाळी**
- **९.३९ वाजल्यापासून मोबाईल स्विचऑफ**
- **शुक्रवारी (ता.१४) गणेशनगर येथील नातेवाईकाच्या घरी मुक्काम**
- **गणेशनगर मधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात सर्वांचे फुटेज कैद**
- **अक्कलकोट येथील कारंजे चौकात बेपत्ता रघूनाथ यांचे शंकर-पार्वती नावचे कटिंग सलुनचे दुकान**

### आई अन् निरंजनची बेपत्ता रघूनाथला भावनिक साद

रघूनाथ हा त्याच्या परिवारासह गायब झाला आहे. त्याच्या गायब होण्यानं सगळं कुंटुंब चिंतातूर झालं आहे. रघूनाथसह अन्य सदस्यांना शोधण्याचं काम निरंजन करीत आहे. याच टप्प्यावर आई पार्वती आणि भाऊ निरंजन यांनी रघूनाथ यास साद घातली आहे.'रघूनाथ; तु कुठे असेल तेथून आपल्या कुटुंबासमवेत परत घरी यावे, आम्ही सगळेजण तुझी आतुरतेने वाट पाहत आहोत.

### त्यानंतर मात्र 'ते' चौघे दिसलेच नाहीत

रघूनाथ कुटुंबासमवेत भाचीच्या लग्नास गेला होता. त्याच दिवशी गणेशनगर येथील नातेवाईकांच्या घरी मुक्काम केला. शनिवारी कुटुंबासमवेत गणेशनगर मधून जात असताना तेथील एका सीसीटीव्ही फुटेज मध्ये चालत जात असताना दिसून आलेले आहेत. त्यानंतर ते दिसलेच नाही.